# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.12.2024** **वार – मंगळवार**

---

**दिव्यांग दिन**

दिव्यांग व्यक्तींना दयेची नाही तर संवेदनशीलतेची गरज आहे, असं प्रतिपादन  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना यावर्षीच्या राष्ट्रीय पुरस्कारांचं वितरण आज राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्लीत करण्यात आलं; त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमात एकंदर 33 व्यक्ती आणि संस्थांना  पुरस्कार प्रदान करण्यात आले. श्रवणदोष असलेल्या मुलांच्या शिक्षिका पुण्याच्या प्रियंका दीपक दबडे यांचा यावेळी गौरव करण्यात आला. तसंच पुण्यातील प्रथमेश सिन्हाच्या कामगिरीचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

**बाबासाहेब पुरंदरे**

शिवशाहीर दिवंगत बाबासाहेब पुरंदरे यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त पुण्यात येत्या शनिवारी आणि रविवारी विशेष व्याख्यानमालेचं आयोजन करण्यात आलं आहे. माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी आणि लेखक विवेक घळसासी यामध्ये आपले विचार मांडणार आहेत. न्यू इंग्लिश स्कूलच्या गणेश सभागृहात संध्याकाळी सात ते साडेआठ यावेळेत ही व्याख्यानं होतील, असं आयोजकांनी सांगितलं आहे.

**गांधी दर्शन शिबिर**

महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्यावतीने येत्या आठ डिसेंबरला गांधी दर्शन शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. कोथरूड भागातल्या गांधी भवनच्या सभागृहात हे शिबीर होणार आहे. गांधी पीस फाऊंडेशनचे अध्यक्ष कुमार प्रशांत, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी, साप्ताहिक ‘साधना’ चे संपादक विनोद शिरसाठ या शिबिरात मार्गदर्शन करणार आहेत.

**पुरस्कार**

माजी आमदार अनंत गाडगीळ यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेला दिलेल्या देणगीतून दोन वर्षांपासून एका ज्येष्ठ आणि एका नवोदित कवयित्रीला सुनीताबाई गाडगीळ स्मृती साहित्य पुरस्कारानं सन्मानित करण्यात येतं. या पुरस्कारासाठी चंद्रपुरच्या ज्येष्ठ कवयित्री पद्मरेखा धनकर आणि पुण्यातील नवोदित कवयित्री प्राजक्ता माळी यांची निवड करण्यात आली आहे. येत्या 13 डिसेंबर रोजी ज्येष्ठ कवी प्रवीण दवणे यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील, अशी माहिती परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी दिली.

**अभय योजना**

राज्यातील घरगुती, व्यवसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजनेला 31 डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असं आवाहन महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केलं आहे. राज्यातील 65 हजार 445 वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला आहे.

**मेट्रो**

स्वारगेट ते कात्रज या प्रस्तावित भुयारी मेट्रो मार्गावर तीन स्थानकं उभारण्यात येणार होती. मात्र लोकप्रतिनिधी तसंच नागरिकांची मागणी लक्षात घेऊन या मार्गावर बालाजीनगर इथं चौथं मेट्रो स्थानक आता उभारलं जाणार आहे. यासाठी पुणे महापालिकेने तत्त्वत: मान्यता दिली असल्याचं वृत्त संस्थेनं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**रासने**

वैकुंठ स्मशानभूमीत कोणत्याही उणीवा राहणार नाहीत याची दक्षता घेऊ अशी ग्वाही आमदार हेमंत रासने यांनी आज दिली. क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि नवलराय ए हिंगोरानी ट्रस्टच्या वतीने वैकुंठ स्मशानभूमीत विविध उपयोगी साहित्य भेट देण्यात आलं; त्यावेळी ते बोलत होते.

**वाहतुकीत बदल**

पुण्याच्या कात्रजच्या मुख्य चौकातील उड्डाणपुलाचं काम सुरू असल्यामुळे या रस्त्यावरच्या वाहतुकीमध्ये बदल करण्यात आला आहे. हे काम आजपासून पुढील आदेशापर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली आहे.

**अमली पदार्थ**

पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने 19 लाख 45 हजार रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. सिंहगड रस्त्यावर गस्ती दरम्यान हे अमली पदार्थ आढळून आले. या प्रकरणी पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे.

**क्रीडा**

53 वी आंतर जिल्हा आणि 86 वी राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा पुण्यात सुरू आहे. या स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंची विजयी आगेकूच कायम आहे. महिला गटात नैशा रेवस्कर, सई कुलकर्णी, अद्या गवात्रे या खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत तिसऱ्या फेरीकडे आगेकूच कायम राखली. तर मुलांच्या पंधरा वर्षाखालील गटात रियांश अग्रवाल यानेही चमकदार विजय नोंदवला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हवामान अंशतः ढगाळ होतं. आज कमाल 31 तर किमान 21 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्याही हवामान अंशतः ढगाळ राहून हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**